**(व्ही. सी. व्दारे)**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०२ चा शपथेवर जबाब

माझे नांव — गजानन कोंडीबा कौळासे,

माझे वय – ३६ वर्ष, धंदा : सहाय्यक पोलीस उप. निरीक्षक.

राहणार – मलकापुर, ता. मलकापुर, जि. बुलढाणा.

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती जे. डी. राठोड यांच्यामार्फत सूरू</u>**

०१. सन २०१८ मध्ये मी सदर बाजार पोलीस ठाणे येथे पोलीस उप निरीक्षक म्हणुन कार्यरत होतो. दि.०३.०९.२०१८ रोजी प्रस्तुत गुन्हयाचा तपास माझ्याकडे वर्ग करण्यात आला. तपासादरम्यान मी घटनास्थळी जाऊन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ गुरु बच्चन चौक येथे होते. घटनास्थळी गुन्हयात वापरलेला चाकु मिळुन आल्याने तो पंचासमक्ष जप्त केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला असता तो तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३२** देण्यात येते. मुद्देमाल पावती फाडली. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यास **नि.क्र.३३** देण्यात येते. मी साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन दोषारोपपत्रासोबत समाविष्ट केले. आता मला वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविले असता ते तेच आहे. त्यास ओळखण्यासाठी आर्टिकल 'अ' देण्यात येते. आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. जप्त चाकु दाखविल्यास मी ओळखु शकेल. आता मला जप्त मुद्देमाल चाकु दाखविण्यात आला. तो गुन्हयात वापरलेला चाकु नाही. तपासात आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. डी. डी. सोनवणे–</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळाचा खोटा पंचनामा तयार केला.

हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी मुद्देमाल पावती तयार केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे दोषारोपपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/-
(सि. म. पाडोळीकर)
दि. २०.०२.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.